Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 01 – 06
DOI: 10.5281/zenodo.8328826

**Original Research Article**

# हैद्राबाद मुक्ती संग्राम- नांदेड जिल्ह्यातील झेंडा सत्याग्रह

डॉ. संतोष सुधाकरराव कोटुरवार
विभाग प्रमुख, इतिहास विभाग, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड ४३१६०१ महाराष्ट्र, भारत
*Corresponding author E-mail:* sskotur1976@gmail.com

Received: 07 September, 2023 | Accepted: 09 September, 2023 | Published: 10 September, 2023

हैदराबादचा मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा एक भाग होता. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात ज्याप्रमाणे वेगवगळया अवस्थातून वाट काढत स्वातंत्र्य प्राप्त केले, त्याप्रमाणेच हैदराबाद मुक्ती संग्रामही वेगवेगळया अवस्थातून वाट काढीत भारतीय संघराज्यात विलिन झाले. याच वाटेतील एक टप्पा म्हणजे झेंडा सत्याग्रह होय. संस्थानात तिरंगा फडकविण्यास कायद्याने बंदी होती. तिरंगा ध्वज हा परराष्ट्राचा ध्वज आहे त्यामुळे संस्थानात कोणीही तिरंगा ध्वज फडकवू नये असे निजाम सरकारने जाहीर केले. त्यामुळे झेंडा सत्याग्रह करणे म्हणजे कायदेभंग करणे असे होते. तेव्हा स्वामीजींच्या नेतृत्त्वाखाली संस्थानात १०४६ गावात झेंडा सत्याग्रह करून निजामी कायद्याचा भंग करण्यात आला. या सत्याग्रहात नांदेड जिल्ह्याने सिंहाचा वाटा उचलला. अनेकांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यांचे कार्य-कर्तृत्त्व पुढील घटनेवरून स्पष्ट होते.

**महत्त्वाचे शब्द:** हैदराबादचा मुक्तिसंग्राम, नांदेड, झेंडा सत्याग्रह, भारतीय स्वातंत्र्य संग्राम, निजाम, रझाकार

## शोध निबंधाची उद्दिष्टे

1) हैदराबाद मुक्तिसंग्रामात नांदेड जिल्ह्याच्या सहभागचा अभ्यास करने.
2) निजाम सरकारच्याविविध कायद्याचा भंग करण्यात नांदेड जिल्ह्याचा वाटा अभ्यासने.
3) नांदेड जिल्ह्यातील झेंडा सत्याग्रहाच्या घटनाच्या अभ्यास करने.
4) हैदराबाद संस्थान विसर्जन करण्यात नांदेड जिल्ह्यातील नागरिकांचे योगदान अभ्यासने

**संशोधन पद्धती व संदर्भ साहित्य**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धत वापरण्यात आली आहे. तसेच मुक्तीसंग्रामा संबंधीत संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, इतिहास संशोधन पत्रिका,विशेषांक इ. दुय्यम स्त्रोत साधनाचा आधार घेण्यात आला आहे.

**नांदेड शहरातील झेंडा सत्याग्रह**

नांदेड जिल्ह्यात झालेल्या विविध सत्याग्रहात झेंडा सत्याग्रह ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. हैदराबाद स्टेट काँग्रेसने दि. ७ ऑगस्ट, १९४७ 'विलिनीकरण दिन' तर ९ ऑगस्ट, १९४७ 'तिरंगा ध्वज वंदन दिन' साजरा करावे असे जाहीर केले. त्यामुळे ९ ऑगस्ट, १९४७ रोजी नांदेड शहरात स्टेट काँग्रेस कार्यालयात झेंडा वंदन करण्याचे निश्चित करण्यात आले. यात शामराव बोधनकर, भगवानराव गांजवे, रघुनाथ रांजणीकर, अनंतराव भालेराव, गोपाळशास्त्री देव यांनी सहभाग घेतला. त्यांच्या मदतीला साहेबराव बारडकर, आबासाहेब लहानकर, गोपाळराव हटकर, देविदासराव लव्हेकर यांनीही सहभाग घेतला. या सर्व मंडळींनी झेंडा सत्याग्रह यशस्वी करावयाचा असा चंग बांधला आणि ९ ऑगस्ट, १९४७ दिवस ठरविण्यात आला. परंतु योगायोगाने त्याच दिवशी मुस्लिम लोकांची ईद होती. ईद सणास कोणतीही अडचण येऊ नये म्हणून रझाकारांनी रायफली, तलवारी, भाले, बरच्या, जंबीये, लाठ्या काठ्या, इ. सर्व साहित्यांची प्रचंड प्रमाणात जमवाजमव केली. तसेच नांदेड जिल्ह्यात स्टेट काँग्रेसने झेंडा फडकविला तर प्रचंड दंगल करून अत्याचाराचा वरवंटा फिरवण्याचा बेत रचून वातावरण तंग करण्यात आले. पोलीस, रझाकार, अरब, रोहिले व पठाण यांच्या बळासमोर आपला निभाव लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली. अशा परिस्थितीत ९ ऑगस्ट रोजी ठरल्या प्रमाणेच झेंडा वंदन करायचेच यापासून माघार घ्यायची नाही असा पुन्हा निश्चय स्टेट काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला व संस्थानात कोठेही ध्वज फडकवू देणार नाही, जर फडकविला तर गंभीर परिणाम होतील अशी घोषणा करून प्रचंड बंदोबस्त निजाम सरकारने वाढविला. त्यामुळे नांदेडमधील परिस्थिती अतिशय स्फोटक बनली. तरीही झेंडा सत्याग्रहासाठी नांदेड शहरातील सराफ्यातील शामराव बोधनकरांची तीन मजली इमारतीची निवड करण्यात आली. या इमारतीवर राष्ट्रध्वज लावावा आणि तो प्रयत्नपूर्वक जतन करावा असे सर्वानुमते निश्चित करण्यात आले. त्याप्रमाणे स्टेट काँग्रेसचे नांदेड जिल्हा सेक्रेटरी भगवानराव गांजवे यांनी आपल्या अनुयायींसह तिरंगा ध्वज सरकारचा विरोध असतांनाही फडकविला. ध्वज डौलाने फडकू लागला ही बातमी त्वरीत सरकारला समजली त्यांनी धर्मांध टोळ्या हाताशी धरून ध्वज काढून टाकण्याचा आदेश दिला. “ध्वज काढून टाका नाही तर याचे गंभीर परिणाम होतील' असा निरोप येऊ लागला. परंतु या धमकावण्याचा स्टेट काँग्रेसच्या मंडळींवर काहीच परिणाम झाला नाही. त्यामुळे डी.वाय.एस.पी.नरसिंगप्रसाद घटनास्थळी पन्नास पोलीसांसह हजर झाला. पोलीसांनी भगवानराव गांजवे यांचा शोध घेतला व त्यांना विचारले, “हा ध्वज कुणी लावला?” गांजवेंनी सांगितले, 'मी लावला'. यावर पोलीस म्हणाले हा परदेशी झेंडा लावण्याचे परिणाम काय होतील याची कल्पना आहे का? जेलमध्ये जावे लागेल. गांजवे म्हणाले मला जेलमध्ये टाका परंतु झेंडा काढणार नाही. हा आपल्या राष्ट्राचा ध्वज आहे व 'हैदराबाद हे भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग

आहे' वातावरण तंग झाले. गोळीबार होऊन दंगल होईल अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतु ईद सण असल्यामुळे झेंडा सत्याग्रह प्रसंगी नांदेडला भीषण दंगल निजाम सरकारला नको होती. म्हणून सरकारचे पोलीस काँग्रेस कार्यकर्त्यांना उद्या वाईट परिणाम भोगावे लागतील, असे धमकावून निघून गेले व ध्वज फडकतच राहिला. दुसऱ्या दिवशी ध्वज काढण्याविषयी विविध प्रयत्न सुरु झाले. कारण ईदची मिरवणुक तिरंगा ध्वजाखालून जाणार नाही असे स्पष्टपणे इत्तेहादुल व रझाकारचे कार्यकर्ते बोलू लागले. तसेच ध्वज काढला नाही तर गावात जाळपोळ होईल, रक्तपात होईल, सराफा लुटण्यात येईल असे धमकावू लागले. सारे नांदेड भयग्रस्त झाले. परंतु स्टेट काँग्रेसच्या नेत्यांनी लोकांना धीर दिला, यामध्ये भगवानराव गांजवे अग्रेसर होते. या प्रकरणात धुमाकूळ झाला तर पहिला बळी भगवानराव गांजवे यांचा जाणार होता, तरीही ते डगमगले नाहीत. परंतु गावातील लोक घाबरुन रावसाहेब मुळावेकरांच्या नेतृत्त्वाखाली एक शिष्टमंडळ गांजवे यांना भेटले व झेंडा सत्याग्रह मागे घ्यावे अशी विनंती केली. कारण गावात दंगल झाली तर शेकडो प्राण जातील, अनेकांची घरे लुटल्या जातील अशी भिती व्यक्त केली. याप्रमाणेच व्यापाऱ्यांनीही आपले म्हणणे मांडले, परंतु या शिष्टमंडळासमोर भगवानराव गांजवे यांनी जे उत्तर दिले, यावरून मुक्तिलढ्यात नांदेड जिल्ह्याचा सहभाग किती तीव्र व आक्रमक होता हे स्पष्ट होते. "आम्ही तर तळहातावर शिरच घेतले आहे, आता जगाचे काय होईल या चिंतेचे ओझे आमच्यावर नको, आम्हांला शुरासारखे मरू द्या, पाप मागे ओढू नको. हा ध्वज स्वातंत्र्य मिळेपर्यंत हजारो रक्ताने रंगला आहे. अजून थोडे रक्त खर्ची पडले तर मी पर्वा करणार नाही " असे बाणेदार उत्तर देऊन मातृभूमीवरील अचाट श्रद्धा व्यक्त केली व ध्वजाबद्दल निष्ठा दाखविली. झेंडा सत्याग्रहात तडजोड करण्यासाठी नांदेडचे जिल्हाधिकारी शहाबुद्दीन आले. परंतु गांजवेंनी माघार घेतली नाही. शेवटी नांदेड इत्तेहादुल मुसलमीनचे अध्यक्ष अखलास हुसेन आले. शामराव बोधनकराच्या घरी बैठक झाली. अखलास हुसेनने एक तास ध्वज खाली घ्या, एका तासात मिरवणूक घेऊन जातो, असे मत मांडले. परंतु स्टेट काँग्रेस कार्यकर्त्यांचे मत होते, ध्वज तिसऱ्या मजल्यावर आहे, त्याचा मिरवणूकीत काहीच अडचण नाही, त्यामुळे ध्वज एक मिनिटसुद्धा खाली उतरणार नाही. शेवटी ध्वज न काढता ध्वजाखालून मिरवणूक जाईल, ध्वजासमोर आपण दोघे उभे राहून शांततेचे आवाहन करू असा तडजोडीचा पर्याय निघाला. ईदनिमित्त चार ते पाच हजार लोकांची मिरवणूक निघाली. सायंकाळी चार वाजता. मिरवणूक सराफ्यात बोधनकरांच्या इमारतीजवळ आली व त्यांना ध्वज दिसला.. ध्वजाखालून जाणार नाही असा मिरवणूकीतील लोकांनी हट्ट धरला. रझाकार, नेते यांच्यात तडजोड झाली, शांततेत जा असा सल्ला देत होते. परंतु मिरवणुकीतील जनता ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. वातावरण तंग झाले व दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. मिरवणुकीतील हजारो लोक ध्वज खाली ओढा म्हणून घोषणा देत होते. हवेत गोळ्या झाडत होते. एक गोळी तर गांजवेच्या अगदी जवळून गेली. जवळच गांजवेच्या रक्षणासाठी वीस शस्त्रधारी रक्षक होते. वातावरण अधिकच चिघळणार अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणून अखलास हुसेन यांनी शेरवाणी काढून झेंड्याखाली धरला. तरीही लोक ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. तेव्हा रघुनाथ रांजणीकरांनी दोन स्फोट घडुन आणले. तेव्हा रझाकार कार्यकर्ते एकदम घाबरले व जिकडे-तिकडे पळू लागले. तासाभरातच वातावरण शांत झाले व उरली सुरली मिरवणूक ध्वजाखालून गेली. ध्वजाखाली धरलेली शेरवाणी काढताना ध्वज थोडा सरकला.

तेव्हा अखलास हुसेन यास ध्वज व्यवस्थित करण्यास भगवानराव गांजवे यांनी सांगितले. तेव्हा अखलास हुसेन याने ध्वज व्यवस्थित पुन्हा उभा केला. दोघांनीही ध्वजास वंदन केले, यावरून स्पष्ट होते की, नांदेडच्या झेंडा सत्याग्रहापुढे निजाम सरकार दबले. पोलीस कार्यवाहीच्या पूर्वीच इत्तेहादुल मुसलमीनच्या अध्यक्षांनी तिरंगी ध्वजास वंदन केले. या घटनेवरून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते, मुक्तिसंग्रामात नांदेडमधील लोकांकडे शस्त्रे होती, परंतु या शस्त्रांपेक्षा लढ्यातील हिंमत हेच महत्त्वाचे शस्त्र ठरत होते.

**मौजे सावरगाव येथील झेंडा सत्याग्रह**

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात मौजे सावरगाव 'गाव लहान पण इतिहास मोठा' अशी ओळख असलेले गाव आहे. या गावातील तरूणाने अलौकिक धैर्य व त्याग दाखविला व सावरगावच्या तरूणांनी तेजस्वी, स्फुर्तीदायी योगदान हैदराबाद मुक्तिलढ्यात दिले. या गावातील जनतेने जुलमी निजामी राजवटीविरूद्ध बंड केले व तिरंगा ध्वज फडकविला. ही घटना जुलै १९४८ मध्ये घडली. सावरगावात तिरंगा ध्वज फडकावून तिरंगा ध्वजाच्या रक्षणार्थ ३० तरूणांची तुकडी तैनात ठेवली. गावातील इतर नागरिक जंगल सत्याग्रहासाठी सहभागी होण्यासाठी गेले. या घटनेची माहिती सरकारला कळताच संतप्त झाले. मनाठा, डोंगरखेडा, तामसा येथील पोलीस, मिलिटरी व रझाकारांनी संयुक्तपणे सावरगावावर हल्ला केला. तिरंगाच्या रक्षणास असलेल्या ३० सैनिकांनी रझाकारांशी झुंज दिली. ती झुंज ५ तास चालली. शेवटी ३० सैनिकांजवळील दारूगोळा संपला. तेव्हा निःशस्त्र अवस्थेत लढा चालू ठेवला. परंतु १२ जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले. ते पुढीलप्रमाणे होते.

१. यानबा दत्ता मुळेकर
२. गोविंदा दत्ता मुळेकर
३. दत्ता हंसाजी मुळेकर
४. नारायण दत्ता मुळेकर
५. बरोडेकर गंगाराम ग्यानबा
६. घोगरे अमृत दिपाजी
७. देशमुख काशीबा जळबा
८. देशमुख दत्ता शिवराम
९. कारखेडे महादु विश्वनाथ
१०. रामाजी कामाजी
११. काष्टी मारोती
१२. डोरवले दशसम संभाजी इ.

**चिकाळयाचा सत्याग्रह**

नांदेड जिल्ह्यात मुदखेडजवळ चिकाळा हे एक लहान गाव होते. येथे १९४७ मध्ये भगवानराव या स्थानिक व्यक्तीने गावातील तरूणांना एकत्र करून लढाऊ दल निर्माण केले व त्यांच्याकडे गावागावातून जाऊन तिरंगा ध्वज घरावर लावण्याचे कार्य दिले. जवळच्या कवठा गावात त्यांनी तिरंगा ध्वज फडकविला ही बातमी मुदखेडच्या पोलीस कार्यालयास समजली. पोलीस व रझाकार चिडले. २०० जवान शस्त्रासह चिकाळा गावास वेढा दिला. गावावर एकदम हल्ला करून पूर्ण गाव लुटले. रझाकारांची संख्या व शस्त्र पाहून कोणीही विरोध केला नाही. ही बातमी जवळच्या रोहिपिंपळगावात समजली व गावातील प्रत्येक व्यक्ती मिळेल ते शस्त्र घेऊन चिकाळयाच्या दिशेने गेले. तेथे रझाकाराचा धुमाकुळ चालूच होता आक्रमक व अचानकपणे रोहीपिंपळगावचे तरूण अनेक रझाकारांवर तुटून पडले. एक रझाकार जागीच ठार झाला. चिकाळयाच्या तरूणांनी गोफणाच्या आधारे रझाकारांवर दगडाचा वर्षाव केला. त्यात दोन रझाकार ठार झाले. स्वातंत्र्य सैनिकांची उत्तरोत्तर संख्या वाढू लागली. रझाकार पळून गेले. अशा पद्धतीने चिकाळा व रोहीपिंपळगावच्या तरूणांनी एकत्रपणे रझाकारांना धडा शिकविला. परंतु या घटनेचे पडसाद पुढे पडले. क्षुल्लक घटनेत स्थानिक लोकांना ठार करण्यात येऊ लागले.

**डोरलीचा झेंडा सत्याग्रह**

१९४७ साली हदगाव तालुक्यातील डोरली या गावी यादवराव पवार यांनी झेंडा वंदनाचा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमास उदगीरचे नेते भाई बन्सीलाल यांना निमंत्रित करण्यात आले. जवळपासचे लोकही जमा झाले. ही बातमी सरकारला कळाली. निजामी पोलीस शस्त्रासह डोरली गावात पोहोचले व कोणतीही पूर्वसुचना न देता लोकांवर एकदम गोळीबार सुरु केला. या गोळीबारात

५ व्यक्ती जागीच ठार झालो तर १५ जण जखमी झाले. रझाकारानी अत्याचार केला तरीही तिरंगा ध्वज रक्षण करुन डोरलीच्या तरुणांनी श्रेष्ठ कामगिरी केली. सावरगाव, डोरली, चिकाळा येथिल सत्याग्रहावरुन स्पष्ट होते. स्वातंत्र्य चळवळीचे कोण ग्रामिण भागापर्यंत पोहचलो होते. भाषा, संस्कृती, धर्म, ध्वज या मातृभूमीच्या अस्मितानां ठेच पोहचू न देण्याची भूमिका नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रप्रेमी तरुणांनी घेतली होती.

**सारांश**

सारांश रुपाने हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात अनेक चळवळीचे केंद्रस्थान नांदेड जिल्हा होता. आर्य समाज, स्टेट काँग्रेस या निजाम विरोधी संघटनांचे अनुयायी व कर्तबगार राष्ट्रभक्त तरुणांची फळी नांदेड जिल्हात सक्रीय होती. त्यामुळे या संघटनामार्फत झालेल्या सत्याग्रहात व चळवळीत नांदेड जिल्ह्याची भरीव कामगिरी आहे. जंगल सत्याग्रह व झेंडा सत्याग्रह करुन निजाम सरकारचे कायदेभंग करण्याचे धाडस जिल्ह्यातील शुर विरांनी वेळोवेळी केली परिणामी निजाम सरकारला संस्थान भारतीय संघराज्यात विलिन करण्याशिवाय पर्याय नाही याची प्रचिती आणून देण्यात नांदेड जिल्ह्याचा वाटा परिणामकारक असल्याचे शोध निबंधातून स्पष्ट होते.

**संदर्भसुची**

१. अनंत भालेराव, हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशनगृह मुंबई १९८७

२. रघुनाथ रांजणीकर, नांदेड जिल्हातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, गांधी भवन मुंबई

३. नरहर कुरूंदकर, हैदराबाद विमोचन आणि विसर्जन, रंजत प्रकाशन, सिडको औरंगाबाद

४. शामलाल राठौर,मुक्तीसंग्राम मे नांदेड जिल्हा,ज्योती प्रकाशन नांदेड १९७६

५. सुधाकर डोईफोडे, प्रतर्दनाचे दिवस, निर्मला प्रकाशन नांदेड १९९९

६. दै. 'मराठवाडा' विशेषांक ९७ (सुवर्ण जयंती महोत्सव)

७. विठ्ठलराव रत्नाळीकर, हु. गोविंदराव पानसरे, पानसरे स्कुल धर्माबाद २६ जाने. १९७२